(३)

**वाचा** :-१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१
२. प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन, महसूल व वने, मंत्रालय यांचे कडील पत्र दिनांक ५ फेब्रुवारी२०२०
३. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे कडील पत्र क्रमांक १३७/२०१८/ FTS१०५४८ दिनांक ४ फेब्रुवारी, २०२०.

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा**
**क्र.नैआ/कावि/ 610 /२०२०**
**दिनांक :-११/०३/२०२०**

## आदेश

ज्याअर्थी,आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, अंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. तसेच अंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसार्गात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती सातारा जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी पूर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

या पार्श्वभूमीवर मी **शेखर सिंह, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, सातारा** जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ लागु झाल्याचे या आदेशाद्वारे घोषीत करीत आहे. उक्त पूर्वतयारी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी **Incident Commander** म्हणून **श्री. डॉ. अमोद गडीकर, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा मो.** 9422471912 cssatara@rediffmail.com व **श्री. डॉ. अनिरुध्द आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा मो.** 9421233250 **dhozpsatara@gmail.com** यांना सनियंत्रक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी ,मी शेखर सिंह , अध्यक्ष , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सातारा असा आदेश देतो की, कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविणेचे अनुषंगाने सामान्य नागरिकांच्या वापरात असलेल्या सर्व जागा / इमारत / सुखसुविधा इत्यादी ठिकाणे म्हणजेच दुकाने , सिनेमा थिएटर, मॉल, शासकीय कार्यालये , कॉलेज, बसस्टँड, रेल्वेस्टेशन , धोबीघाट, प्रेक्षणीय / धार्मिक स्थळे क्रिडागण , बगीच्या इत्यादी इमारती व त्यांचा परिसरातील नियमित निजंतूर्कीकरण व स्वच्छता करावी वर नमूद सार्वजनिक ठिकाणी करोना संकर्मण व वृध्दी होणार नाही या दृष्टीने आवश्यक असणारी सर्व खबरदारी घ्यावी. या सार्वजनिक ठिकाणी वर नमूद केलेल्या प्रमाणे स्वच्छतेविषयक अंमलबजावणी केली नाहीतर संबंधीत सार्वजनिक ठिकाण सार्वजनिक वापरासाठी बंद करुन सील करणेत येईल.

**(शेखर सिंह)**
**जिल्हाधिकारी सातारा तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा**

**प्रति,**

______________________

______________________

**प्रत - 1. मा.विभागीय आयुक्तसो, पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.**

Scanned by CamScanner